तंत्रज्ञान अधिविभाग.
दि. ०७.१२.२०२३

# केंद्रशासनाची दिव्यांगजन शिष्यवृत्ती योजनेबाबत सुचना

तंत्रज्ञान अधिविभागातील सर्व बी. टेक. व एम्. टेक. शैक्षणिक वर्ष २०२३–२४ मधील विदयार्थ्यांना कळविणेत येते की, केंद्रशासनाची दिव्यांगजन शिष्यवृत्ती योजनेचे अर्ज दिनांक ३१.१२.२०२३ रोजीपर्यंत ऑनलाईन अर्ज https://scholarships.gov.in या संकेतस्थळावर भरून आवश्यक कागदपत्रासहीत कार्यालयामध्ये जमा करावीत.

Gaikwad 08/12/23
संचालक
Director
Department of Technology
Shivaji University, Kolhapur

सदर शिष्यवृत्ती XI,XII, Post-Matriculation Diploma/Certificates, Bachelor's Degree or Diploma in India, Master's Degree/Diploma from any University recognized by UGC/AICTE या अभ्याक्रमासाठीचे विद्यार्थी अर्ज भरण्यासाठी पात्र आहेत.

**किमान पात्रता व अटी :**

1. अपंगत्व टक्केवारी 40 टक्के किंवा त्यापुढील असावी.
2. मागील वार्षिक परिक्षेत उत्तीर्ण झालेला असावा.
3. अर्जदार इतर कोणत्याही शिष्यवृत्ती योजनेचा/ स्टायपेंड लाभार्थी नसावा.
4. अर्जदाराच्या पालकांचे एकत्रित वार्षिक उत्पन्न मर्यादा रु.2.50 लाख पर्यंत असावे.
5. एका कुटुंबातील फक्त दोन अपत्यांना सदर योजनेचा लाभ घेता येईल ( जर दुसरे व तिसरे आपत्य जुळे असतील तर सदर योजनेचा लाभ घेता येईल.)

156846/2023 **ऑनलाईन अर्ज करण्याची कार्यपध्दती:-**

1. दिव्यांगजन विद्यार्थ्यांसाठी पोस्ट मॅट्रिक शिष्यवृत्ती योजनेच्या मार्गदर्शक सूचनेनूसार पात्र व इच्छुक विद्यार्थ्यांनी नवीन मंजूरीसाठी व नूतनीकरणसाठी www.scholarshps.gov.in या संकेतस्थळावर आधार क्रमांक नमुद करुन अर्ज ऑनलाईन पध्दतीने अर्ज भरणे आवश्यक आहे
2. विद्यार्थ्यांनी ऑनलाईन अर्ज करण्याची अंतिम मुदत **दि.31.12.2023** ही आहे.
3. विद्यार्थ्यानां आधार आयडी (UDID)असने व तसेच लाभार्थ्यांच्या नावे असलेल्या चालू स्थितीत (Operative / Active Mode) बँक खात्याशी सलग्न असणे आवश्यक आहे जेणेकरुन शिष्यवृत्तीचा लाभ घेण्यासाठी आधार आधारित बायोमेट्रिक प्रमाणीकरण केल्यानंतर विद्यार्थ्यांच्या बँक खात्यामध्ये शिष्यवृत्तीची रक्कम जमा करणे सुलभ होईल.
4. विद्यार्थ्यांना अर्ज भरण्याकरिता दिव्यांगजन असल्याचे ओळखपत्र (UDID) असणे आवश्यक आहे.
5. अर्जदारांनी अर्ज प्राप्त करण्यासाठी विहित केलेल्या शेवटच्या तारखेच्या आत ऑनलाईन प्रणालीद्वारे त्यांचे अर्ज सादर करावेत. सर्व आवश्यक कागदपत्रे जसे की फोटो, वयाचा पुरावा, अपंगत्व प्रमाणपत्र, पालकांचे उत्पन्न प्रमाणपत्र, शिक्षण शुल्काची पावती अंतिम शैक्षणिक पात्रता प्रमाणपत्र इ. विहित नमुन्यात रीतसर भरलेले ऑनलाईन पध्दतीने अपलोड करणे आवश्यक आहे. तसेच वरील सर्व कागदपत्रासह आपल्या महाविद्यालयाकडे पुढील कार्यवाहीकरिता सादर करावेत.
6. ऑनलाईन अर्ज भरताना काही अडचण निर्माण झाल्यास आपल्या महाविद्यालय/संस्थेशी संपर्क साधनू सदर अर्ज पुर्ण करुण घ्यावा. तसेच उपरोक्त संकेतस्थळाच्या Homepage वरील SOP (Standard Operating Procedure) वाचून व समजून घेऊनच ऑनालईन अर्ज भरावा.
7. जर उमेदवार एका राज्याचा कायमचा रहिवासी असेल परंतू दुस-या राज्यात शिकत असेल तर, सदर विद्यार्थ्याच्या अर्जाची शिफारस त्या राज्याच्या शिक्षण/कल्याण विभागाने केली पाहिजे ज्याचा तो कायम रहिवासी आहे.
8. एखाद्या विद्यार्थ्यांने खोटया कागदपत्राद्वारे शिष्यवृत्ती मिळवल्याचे आढळल्यास, त्याची/तिची शिष्यवृत्ती त्वरित रद केली जाईल आणि दिलेली शिष्यवृत्तीची रक्कम अपंग व्यक्तींच्या सक्षमीकरण विभाग, सरकारच्या निर्णयानूसार वसूल केली जाईल. तसेच संबंधित विद्यार्थ्याला काळया यादीत टाकले जाईल आणि कोणत्याही योजनेतील शिष्यवृत्तीपासून कायमचे वंचित केले जाईल.
9. विद्यार्थ्याला शिष्यवृत्ती ज्या अभ्यासक्रमासाठी प्रदान करण्यात आली होती त्या अभ्यासाच्या विषयामंध्ये विद्यार्थ्याने बदल केल्यास दिलेली संबंधित विद्यार्थ्यांची शिष्यवृत्ती रद करण्यात येईल.
10. सदर शिष्यवृत्तीची रक्कम भारत सरकारच्या अपंग व्यक्तींच्या सक्षमीकरण विभागाच्या मार्फत देण्यात येते, परंतू ज्या अभ्यासक्रमांसाठी शिष्यवृत्ती प्रदान देण्यात आलेली आहे तो संबंधित अभ्यासक्रम बंद केल्यास सदरहू विद्यार्थी शिष्यवृत्तीची रक्कम परत करण्यास जबाबदार आहे. तसेच विद्यार्थ्यांला देण्यात आलेला देखभाल भत्ता 1 एप्रिलपासून किंवा प्रवेशाच्या महिन्याघासून, यापैकी जे नंतर असेल, परीक्षा पूर्ण झालेल्या महिन्यापर्यंत, शैक्षणिक वर्षाच्या शेवटी देय असेल, परंतू जर विद्यार्थी महिन्याच्या 20 तारखे नंरत प्रवेश घेतला असेल तर प्रवेशाच्या महिन्याच्या पुढील महिन्यापासून रक्कम देण्यात येईल.

156846/2023

11. मागील वर्षामध्ये देण्यात आलेल्या शिष्यवृत्तीच्या नूतनीकरणाच्या बाबतीत, [illegible] असल्यास, मागील वर्षात ज्या महिन्यापर्यंत शिष्यवृत्ती दिली गेली होती त्या महिन्यापासून देखभाल भत्ता देण्यात येईल.
12. विद्यार्थी जर एकाच वेळी दोन अभ्यासक्रमध्ये शिक्षण असेल तर कोणताही एकाच अभ्यासक्रमासाठी शिष्यवृत्तीचा लाभ देण्यात येईल.
13. दुरस्त शिक्षण (Distance Education) घेणारे विद्यार्थी देखील सदर शिष्यवृत्तीचा अर्ज भरण्यास पात्र असतील.

**शिष्यवृत्ती वितरणाची पध्दत :-**

1. शिष्यवृत्ती योजनेसाठी निवड झालेल्या नवीन मंजुरीचे व नूतनीकरण्याचे विद्यार्थ्यांना DBT मोडद्वारे आधारशी लिंक केलेल्या त्यांच्या बँक खात्यात शिष्यवृत्तीची रक्कम थेट जमा केली जाईल.
2. नवीन मंजुरीच्या विद्यार्थ्यांसाठी योजनेचा लाभ संपुर्ण देशात देण्यात येत असल्याने राज्य सरकारच्या संबंधित विभाग/नोडल अधिका-याने केलेल्या ऑनलाईन पडताळणीच्या आधारे आणि अपंग व्यक्तींच्या राज्यनिहाय लोकसंख्येची टक्केवारी लक्षात घेऊन, राज्यवार प्राप्त झालेल्या नवनी मंजूरीच्या अर्जांची संख्या पैकी पात्र अर्जांच्या एकुण संख्येच्या संबंधात टक्केवारीच्या अटींमध्ये रुपांतरित केली जाईल आणि त्यानंतर अपंग व्यक्तींच्या राज्य निहाय लोकसंख्येची सरासरी टक्केवारी आणि पात्र अर्जांची राज्यनिहाय टक्केवारीवर आधारित राज्यनिहाय शिष्यवृत्तीच्या लाभार्थ्यांची संख्या निश्चित केला जाईल. तसेच लाभार्थ्यांच्या निवडीसाठी योग्यता निकष अपंगत्व प्रमाणपत्रात दर्शविल्यानुसार अपंगत्वाची 40 टक्केवारी असलेला विद्यार्थी अर्ज करण्यास पात्र असेल व समान अपंगत्व टक्केवारी असेल तर ज्या विद्यार्थ्याचे वय जास्त आहे त्या विद्यार्थ्यास निवड यादी मध्ये प्राधान्य देण्यात येईल.
3. नूतनीकरण्याच्या विद्यार्थ्यासाठी जे विद्यार्थी अर्जांची अंतिम पडताळणी केंद्रशासनामार्फत केल्यानंतर पात्र ठरलेल्या अशा सर्व विद्यार्थ्यांना शिष्यवृत्तीची रक्कम देण्यात येईल.

**शिष्यवृत्तीची कालावधी आणि नूतनीकरण**

1. एकदा दिलेल्या शिष्यवृत्तीचा लाभ तो अभ्यासक्रम पुर्ण करण्यासाठी ज्या टप्यावर दिली जाईल त्या टप्यापासून प्रभावी होईल आणि उपस्थितीत नियमितता असेल तरच पुढील शिक्षण होईपर्यंत त्याचे नूतनीकरण करण्यात येईल परंतू एकाच वर्गात दुस-यांदा बसल्यास दुस-यावर्षी विद्यार्थ्याला शिष्यवृत्तीचा लाभ मिळणार नाही.
2. जर एखादा विद्यार्थी आजारपणामुळे किंवा इतर कोणत्याही अनपेक्षित घटनेमुळे वार्षिक परीक्षेत बसू शकला नाही तर, वैद्यकीय प्रमाणपत्र आणि/किंवा इतर आवश्यक पुरावे सादर केल्यावर पुढील शैक्षणिक वर्षासाठी सदरहू विद्यार्थी नुतनीकरणाचा अर्ज भरण्यास पात्र असेल.
3. एखाद्या विद्यार्थी ATKT घेऊण पुढील वर्गात प्रवेश मिळला असेल तर सदरहू विद्यार्थी शिष्यवृत्ती मिळण्यास पात्र असेल.